MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.
(A Govt. of Maharashtra Undertaking)
CIN: U40109MH2005SGC153645

Office of the Chief Engineer (Dist/ Testing)
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.
"Prakashgad", 5th Fl., Dr. A.Kanekar Road,
Bandra (E), Mumbai-400051.
Tel.: (P) 26478252 (O) 26474211 Extn: 2207
Email: cetesting@mahadiscom.in
Website: www.mahadiscom.in

CE/Dist/T/Safety/EL/ 020529 Date: 24 AUG 2018

**CIRCULAR**

**Sub: Guidelines for observing Electrical Safety and reduction in Accidents thereof.**
Ref:-1) CEI/Tech/924/2018 dated 05/06/2018.
2) CEI/776/2018 dated 07/05/2018.
3) O.N. ref. SE/LM/174 dated 03/08/2018.

This office is in receipt of letter of Chief Electrical Inspector, Mumbai regarding the subject matter. It is informed that about 90% of electrical accidents in the state are occurred on MSEDCL's electrical infrastructures and the reason for increase in number of electrical accidents is mentioned as inappropriate method of construction adopted for installation of electric system setups and overhead lines installations. The copy of the letter is attached herewith for your reference.

In order to strictly follow the electrical safety rules and regulations and reduction in electrical accidents accordingly, following actions needs to be taken by all the field offices with immediate effect:-

1) All the relevant provisions regarding electrical safety in the Electricity Act 2003 and Central Electricity Authority (Measures relating to Safety and Electric Supply) Regulations, 2010 should be followed strictly.
2) Permission from Chief Electrical Inspectorate office for all electric system layouts (Method of Construction) which are to be installed should be taken.
3) Permission from Electrical Inspectorate office should be taken for commissioning of Electric Installation and discrepancies observed if any should be rectified before charging the installation.
4) Concerned Zonal Chief Engineer/ SE(O&M) shall conduct co-ordination meetings with respective Electrical Inspector on regular intervals regarding safety related issues, Commissioning of Installations, Permission of layouts & charging, discrepancies in method of construction, Intimations of Accidents, enquiry, Police reports, difficulties in works etc.

This is for your information and further immediate necessary action please. The softy copy of the Circular is available on the MSEDCL's website.

Encl: as above

(Kishor Shegokar)
Chief Engineer (Dist/Testing)

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,**
मुख्य विद्युत निरीक्षक, मुंबई यांचे कार्यालय, ३ रा मजला,
प्रशासकीय इमारत, रामकृष्ण चेंबुरकर मार्ग, चेंबुर (पुर्व) मुंबई ४०० ०७१.
E-mail - ceimumbai.nrg-mh@gov.in
दुरध्वनी क्र. ०२२- २५२७४६१३

जा.क्र. मुविनि/ १७७६/२०१८.
दिनांक 07 MAY 2018

प्रति,

प्रादेशिक संचालक (कोकण विभाग),
महावितरण कंपनी मर्यादित,
प्लॉट क्र. डी-१/२, बारावे रोड,
गोदरेज हिल, कल्याण (प.) ठाणे- ४२१ ३०१.

विषय :- विद्युत सुरक्षिततेचे संवर्धन होऊन विद्युत अपघातांची संख्या कमी करण्यासाठी महावितरण कंपनीच्या वरिष्ठ अधिका-यां समवेत समन्वय बैठक आयोजित करणेबाबत.

विद्युत अधिनियम २००३ व त्याअंतर्गत केंद्रिय विद्युत प्राधिकरण (विद्युत पुरवठा व सुरक्षा बाबतचे उपाय) विनियम २०१० च्या तरतूदींनुसार सर्व विद्युत संचमांडण्यांची उभारणी, संचलन (Operation) व परिरक्षण करणे महावितरण कंपनी यांचेवर बंधनकारक आहे. तसेच विद्युत अपघातांबाबत सूचना व अहवाल विहित मुदतीत विद्युत निरीक्षक यांना सादर करण्याचीही जबाबदारी महावितरण कंपनीवर कायदयाने सोपवलेली आहे.

विद्युत अधिनियम २००३ व त्याअंतर्गत केंद्रिय विद्युत प्राधिकरण (विद्युत सुरक्षा व वीज पुरवठा संबंधीचे उपाय) विनियम - २०१० मधील तरतूदींचे सुरक्षिततेच्या दृष्टीने अनुपालन महावितरण कंपनी व इतर परवानाधारक विद्युत पुरवठाकारांकडून होत असल्याची तपासणी करुन वीजसंचमांडण्यांच्या उर्जापनास परवानगी देणे, अपघाताच्या प्राप्त सुचनेनुसार चौकशी करून अपघाताचे कारण निश्चित करणे, पोलीसांना अभिप्राय देणे इ. कर्तव्य मुख्य विद्युत निरीक्षक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, यांच्या अधिपत्याखालील विद्युत निरीक्षणालया मार्फत पार पाडण्यात येत आहेत.

वरील विवेचनावरुन स्पष्ट होते की महावितरण कंपनी व शासनाचा विद्युत निरीक्षणालय विभाग यांचे कार्य घनिष्ठ व दैनंदिन सुरक्षेशी संबंधित आहे. या विभागाच्या असे निदर्शनास आले आहे की, राज्यातील विद्युत अपघातांच्या संख्येमधील ९० टक्क्यांपेक्षा जास्त अपघात हे महावितरण कंपनीच्या विद्युत संचमांडण्यांवर होत आहेत. महावितरण कंपनीच्या वीजसंच मांडण्यांच्या उभारणी / संचलन / परिरक्षण यातील दोष / त्रुटी, अपघात सुचना, चौकशी, पोलीस अभिप्राय इ. बाबत दोन्ही विभागातील वरिष्ठ अधिका-यांनी समन्वय बैठका घेतल्यास कामकाजात सुसूत्रता येऊन विद्युत सुरक्षिततेचे संवर्धन होऊन अपघातांची संख्या निश्चितच कमी होण्यास मदत होऊ शकेल.

मा.मंत्री, ऊर्जा नवीन व नवीकरणीय ऊर्जा उत्पादन शुल्क यांनी समन्वय बैठक होणे बाबत वेळोवेळी निर्देश दिलेले आहेत. त्यास अनुसरुन कोकण विभागाच्या प्रादेशिक संचालकांसह सर्व मुख्य अभियंते, अधीक्षक अभियंते यांच्या समवेत मुख्य विद्युत निरीक्षक यांच्या दालनात **दिनांक-१८/०५/२०१८** रोजी **१२.००** वाजता बैठक आयोजित करण्यात येत आहे. सदर बैठकीस आपण स्वत:, आपल्या अधिनस्त सर्व मुख्य अभियंते, अधीक्षक अभियंता यांचेसह उपस्थित राहावे अशी विनंती आहे.

सदर बैठकीस खालील प्रमाणे विषयपत्रिका निश्चित करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने उचित कागदपत्रे व माहितीसह उपस्थित रहावे.

**विषय पत्रिका.**

१. विद्युत अधिनियम २००३ व केंद्रीय विद्युत प्राधिकरण (विद्युत सुरक्षा व वीज पुरवठा संबंधीचे उपाय) विनिमय-२०१० यातील तरतूदींच्या अनुपालनात आढळलेल्या त्रुटी व कामकाजातील अनुषांगिक अडचणी उदा.- NIS, अग्निशमन यंत्रणा.

२. अपघातांची सुचना व सुचना अहवाल फॉर्म विहीत मुदतीत प्राप्त न होणे.

३. अपघात चौकशीचा पोलीसांना देण्यात येत असलेला अभिप्राय याबाबत पोलीस व न्यायालयीन यंत्रणा यांचेकडून मागणी करण्यात येत असलेला वाढीव तपशील उदा.- अपघाताची व्यक्ती निहाय जबाबदारी निश्चिती इ. व इतर

४. पायाभूत संरचना (Infrastructure) व इतर योजना खालील कामे - उभारणीची संरचना (Method Of Construction) मंजूर करणेबाबत.

५. नुकसान भरपाई बाबत तपशील.

६. विदयुत सुरक्षेबाबत प्रबोधन.

(सु.रा.बागडे)
मुख्य विद्युत निरीक्षक,
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, चेंबुर, मुंबई.

प्रत- मा.मंत्री, (ऊर्जा नवी व नवीकरणीय ऊर्जा व राज्य उत्पादन शुल्क) मंत्रालय यांचे खाजगी सचिव यांना माहितीसाठी सादर.

प्रत - प्रधान सचिव (ऊर्जा) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय यांचे यांना माहितीसाठी सादर.

प्रत - अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण कंपनी यांना माहितीसाठी सादर.

प्रत - संचालक (संचालन) महावितरण कंपनी यांचे माहितीसाठी.

प्रत - अधीक्षक अभियंता मुंबई, प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ यांना बैठकीची व्यवस्था करण्यासाठी व विषयपत्रिकेतील विभागनिहाय माहिती दि. १४/०५/२०१८ पर्यंत सादर करण्यासाठी रवाना.

अ.अ./ ...
दिनांक: 18/7/18

LK-55104/2018

## महाराष्ट्र शासन


मुख्य विद्युत निरीक्षक, मुंबई यांचे कार्यालय,
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
३ रा मजला,प्रशासकीय इमारत,
रामकृष्ण चेंबुरकर मार्ग, चेंबुर (पूर्व) मुंबई-७१


S.E. (L.M.) 2444
DATE 25.7.18

| | |
|---|---|
| e-mail : **ceimumbai.nrg-mh@gov.in** | दूरध्वनी क्र :- ०२२/२५२७४६१३ |
| जा.क्र. मुविनि/तांत्रिक/ 628 /२०१८ | दिनांक :- 05 JUN 2018 |

प्रति,
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
महावितरण, प्रकाशगड,
बान्द्रा (पुर्व), मुंबई-४०० ०५१.

विषय :- नव्याने उभारण्यांत येणा-या वीजसंचमांडण्यांचे नकाशे ( Method of Construction ) मुख्य विद्युत निरीक्षक यांचेकडून मंजूर करून घेणेबाबत.

संदर्भ :- या कार्यालयाचे संचालक (संचलन), महावितरण यांना पाठविलेले पत्र क्रमांक. मुविनि/तांत्रिक/७३५/२०१८ दि.२७/०४/२०१८ .

CMD pl
Secy
Dir (Proj)/Dir (OP) pl

या विभागाच्या असे निदर्शनास आले आहे की, विद्युत अपघातांच्या वाढत्या प्रमाणास वीजसंचमांडणीची व उपरी तारमार्ग वाहिनीची अयोग्य उभारणी कारणीभूत आहे. विद्युत अपघांताची संख्या कमी करण्याबाबत मा.मंत्री, ऊर्जा , नविन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार कारवाई करणेबाबत संचालक, संचलन यांना संदर्भाधिन पत्रान्वये कळविण्यांत आले आहे. त्याची प्रत आपल्या अवलोकनार्थ व माहितीसाठी सादर केलेली आहे.

तरी, महावितरण कंपनीच्या सर्व परिमंडळ, प्रादेशिक मंडळ व विभागीय कार्यालयांना वरील सूचनांचे तंतोतंत अनुपालन करण्याबाबत सूचित करण्यात यावे, हि विनंती.

S.E. (R.E.)
S.E. (D...)
E.E. (Compl.)
E.E. RE I
E.E. RE III
E.E. D III
E.E. D IV
E.E. (Testing)
Dy. Manager (F & ...)
GAD.

सोबत :- संदर्भिय पत्राची प्रत.

urgent
- Please reiterate to field officials incl testing engineers.
27/6

(सु.रा.बागडे)
मुख्य विद्युत निरीक्षक,
चेंबुर, मुंबई.

प्रत :- खाजगी सचिव मा.मंत्री, ऊर्जा , नविन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र शासन यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत :- प्रधान सचिव(ऊर्जा), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.